नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक १३/०९/२०२२ (मंगळवार)

(दुपार)

---

## बायोडिझेल रसायन ४४,१३,००० रूपयाचा माल जप्त
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १२/०९/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील मौजा कडोली संपत धाबा येथे एमएच–०४/एफयु–७०६६ क्रमांकाच्या टँकर ट्रकची पाहणी केली असता टॅन्कर मध्ये बायोडिझेल सारखे रसायन भरलेले मिळून आले. त्यामुळे पुरवठा निरीक्षक कामठी यांच्यासह सदर टँकर ताब्यात घेऊन टॅन्कर मध्ये असलेल्या रसायनाची तपासणी केली असता टॅन्कर मध्ये अंदाजे २८,४०० लिटर बायोडिझल प्रती लि.कि. ८५/–रू. प्रमाणे कि. २४,१३,०००/–रू. व १२ चक्का ट्रक एमएच–०४/एफयु–७०६६ कि. २०,०००,००/– रू. असा एकुण कि. ४४,१३,०००/– रूपये चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करून पुढील कार्यवाही करिता कागदपत्र व मुद्देमाल पोस्टे मौदा यांचे ताब्यात दिले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे श्याम पंचभाई (पुरवठा निरीक्षक तह.कार्या.कामठी) यांचे रिपोर्टवरुन पोलीस ठाणे मौदा येथे अप.क्र. ६०४/२०२२ कलम २८५ भादवी सहकलम ३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपी जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे मौदा येथील पोनि खराबे मो.क्र. ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत काळे, पोउपनी श्री. भरत थिटे, पोहवा श्री. मदन आसतकर, श्री. विनोद काळे, श्री. नरेंद्र पटले, श्री. पोना बालाजी साखरे, श्री. रोहन डाखोडे, श्री. प्रणय बनाफर, श्री. अजिज शेख, श्री. चापोशी आशितोष लांजेवार यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर